क्रमांक : ६७७८/ ब
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,
विधान भवन, मुंबई.
दिनांक : २५ मार्च, २०२३

## :: प रि प त्र क ::

**विषय : महाराष्ट्र विधानसभेच्या सन २०२३ च्या प्रथम (अर्थसंकल्पीय) अधिवेशनातील जादा आठवड्याचे तारांकित प्रश्न व अर्धा तास चर्चेच्या सूचना तसेच अल्पसूचना व्यपगत करण्याबाबत**

महाराष्ट्र विधानसभा कामकाज सल्लागार समितीच्या बुधवार, दिनांक ८ फेब्रुवारी, २०२३ रोजीच्या बैठकीत सन २०२३ च्या प्रथम (अर्थसंकल्पीय) अधिवेशनाकरिता शनिवार, दिनांक २५ मार्च, २०२३ रोजीपर्यंत सभागृहाचे कामकाज निश्चित करण्यात आले. त्यानुसार सोमवार, दिनांक २७ मार्च, २०२३ ते शुक्रवार, दिनांक ३१ मार्च, २०२३ या अतिरिक्त पाचव्या आठवड्याकरिता कार्यवाहीत घेतलेल्या तारांकित प्रश्नांच्या सूचना तसेच अधिवेशन कालावधीत प्राप्त झालेल्या अर्धा-तास चर्चेच्या सूचनांपैकी बॅलटमध्ये आलेल्या व दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात येऊन चर्चा न झालेल्या प्रलंबित अर्धा-तास चर्चेच्या सूचना व अल्पसूचना व्यपगत करण्यात आल्या आहेत.

**(सीमा तांबे)**
अवर सचिव (समिती)
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

**प्रति,**

(१) मा.मुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव
(२) मा.उपमुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव
(३) मा.मंत्री यांचे खाजगी सचिव
(४) सर्व मंत्रालयीन विभाग, मंत्रालय, मुंबई
यांना माहितीसाठी तथा कार्यवाहीसाठी अग्रेषित.